11 APR 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पीएच.डी.च्या नियमावलीस मान्यता

## शिवाजी विद्यापीठ विद्या परिषद; 'एपीआय गुणांक'बाबत शिफारस

**कोल्हापूर :** विविध अभ्यासक्रमांतील एम.फिल. आणि पीएच.डी. नियमावलीच्या दुरुस्तीसह मान्य करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस सोमवारी शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषदेने मान्यता दिली.

विद्यापीठ कार्यालयात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विद्या परिषदेची बैठक झाली. सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते. यात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार बोर्ड ऑफ डिन्स व बोर्ड ऑफ रिसर्च यांच्या शिफारशीनुसार एम.फिल., पीएच.डी. नियमावली दुरुस्तीसह मान्य करणेबाबत व्यवस्थापन परिषदेला शिफारस केली. उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या तिसरी व चौथी सुधारणा यांच्या अनुषंगाने महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांसाठी सुधारित केलेला एपीआय गुणांक मसुदा मान्य करण्याची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. विविध अहवालांच्या अनुषंगाने संलग्नीकरण देण्याबाबतचे निर्णय घेण्यात आले.

### नवीन विद्यापीठ कायद्याबाबत उद्या चर्चासत्र

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ बाबत शिवाजी विद्यापीठात बुधवारी (दि. १२) सकाळी अकरा वाजता राजर्षी शाहू सभागृहात चर्चासत्र आयोजित केले आहे. यात प्रभारी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. आर. एस. माळी, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सहसचिव सिद्धार्थ खरात, शिक्षण तज्ज्ञ आनंद मापुस्कर, प्रा. सुधाकर मानकर, एस. जी. कुलकर्णी मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 APR 2017 सकाळ

# सेट-नेट मार्गदर्शन कार्यशाळा महत्त्वाची

## महेश काकडे : दूरशिक्षण केंद्रातर्फे कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १० : शिक्षकी पेशा आज पर्वणीचा पेशा असल्याने सेट-नेट मार्गदर्शन कार्यशाळा महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी केले. शिवाजी विद्यापीठांतर्गत दूरशिक्षण केंद्रातर्फे आयोजित एकदिवसीय सेट-नेट मार्गदर्शन कार्यशाळेत ते बोलत होते. दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे अध्यक्षस्थानी होते.

श्री. काकडे म्हणाले, 'प्रत्येक विद्यार्थ्याने भविष्याबद्दल आशावादी राहावे. आज प्रत्येकाला प्रत्येक क्षेत्राची जाणीव झाली असल्याने प्रत्येकाने स्वत:मधील भ्रम दूर करण्यासाठी योग्य असाच रस्ता निवडला पाहिजे. आजचे विद्यार्थी शिक्षकी पेशाकडे वळत आहेत. यामध्ये मुलींची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे आगामी काळात देश कोणत्या दिशेने जात आहे, याची ही झलक आहे.''

ते म्हणाले, ''माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात लौकिक ज्ञानाला विशेष महत्त्व आहे. कौशल्याची कसोटी ही परीक्षा असते. ती प्रत्येकाला द्यावी लागते. या वाटेवरून जाताना अनेक लोक भेटतात आणि रस्ता दाखवतात; परंतु जो नेमकेपणाने वाट शोधतो तोच या मार्गावर यशस्वी होतो. आज प्रत्येक क्षेत्र आव्हानात्मक बनले आहे. समाजात संस्कृतीचा विचार फक्त शिक्षणामुळे शिल्लक राहिला आहे. हा संस्कार आपण विसरून चाललो आहोत. तो टिकवणे व रुजवण्याचे काम शिक्षणातूनच होईल.''

कार्यशाळेसाठी सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातून ८० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रा. डॉ. गजानन राशिनकर, डॉ. के. बी. पाटील व डॉ. व्ही. एस. खंडागळे यांनी विद्यार्थ्यांना सेट-नेट परीक्षेबाबत अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, वेळेचे महत्त्व, परीक्षेची तयारी, प्रश्न सोडविण्याचे तंत्र याविषयी मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर समर्पक चर्चा केली.

डॉ. एस. एम. अपराज यांनी स्वागत केले. डॉ. कृष्णा पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 APR 2017
पुढारी

# 'नवीन विद्यापीठ कायदा' विषयावर उद्या चर्चासत्र

**कोल्हापूर :** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ बाबत बुधवार, दि. १२ रोजी सकाळी ११ वाजता राजर्षी शाहू सभागृह येथे मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आर. एस. माळी, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सह सचिव सिद्धार्थ खरात, शिक्षण तज्ज्ञ आनंद मापुस्कर (मुंबई), प्रा. सुधाकर मानकर, प्रा. एस. जी. कुलकर्णी (कोल्हापूर) हे मार्गदर्शन करणार आहेत. चर्चासत्रास सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक व अधिकारी यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 APR 2017
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठात उद्या चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्यावतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनयम २०१६ विषयावर मार्गदर्शनपर चर्चासत्राचे आयोजन बुधवारी (ता. १२) सकाळी ११ वाजता केले आहे. राजर्षी शाहू सिनेट सभागृहात चर्चासत्र होणार आहे. चर्चासत्रात प्रभारी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आर. एस. माळी, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सहसचिव सिद्धार्थ खरात, आनंद मापुस्कर, प्रा. सुधाकर मानकर व प्रा. एस. जी. कुलकर्णी नवीन कायद्याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. चर्चासत्रास विभागप्रमुख, संचालक, समन्वयक व अधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाच्यावतीने केले आहे.

11 APR 2017 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केआयटीतील कार्यशाळेस प्रतिसाद




कोल्हापूर : डॉ. ए. व्ही. सत्रे यांना मानचिन्ह देताना प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी. शेजारी प्रा. एस. एस. माने, प्रा. एस. एम. पिसे.

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १० : केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालय, आयएसटीईतर्फे 'संशोधनातून संस्थात्मक विकास' यावर दोन दिवसीय कार्यशाळा झाली. राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाचे सचिव डॉ. ए. व्ही. सप्रे म्हणाले, "नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या संशोधनाने, वापरानेच भारत विकसित राष्ट्र बनू शकेल." आरजीएसटीसीमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रकल्पांची डॉ. सप्रे यांनी माहिती दिली. प्रा. डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी, प्रा. एस. एस. पिसे, प्रा. एस. एस. माने उपस्थित होते.

कार्यशाळेतील पहिल्या दिवसाच्या दुसऱ्या सत्रात वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयातील यांत्रिकी विभागप्रमुख प्रा. डॉ. उदय दबडे यांनी संशोधनासाठी साहित्य पुनरावलोकन कसे करावे, केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध संस्थांतून संशोधनासाठी निधी कसा मिळवायचा याबाबत माहिती दिली. शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. घुले यांनी बौद्धिक मालमत्ता अधिकाराचे विश्लेषण केले. नीटी मुंबईच्या प्रा. डॉ. खांजोडे यांनी संशोधन प्रबंध लिखाणासाठी आवश्यक बाबी तर आयआयटी मुंबईच्या सारंग कुलकर्णी यांनी विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्था, विद्यापीठांत पीएच.डी. आणि संशोधनासाठी उपलब्ध संधींविषयी सांगितले. केआयटीतील माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख प्रा. तानाजी पाटील यांनी संशोधन प्रबंध लिखाणासाठी लेटेक्स सॉफ्टवेअरचे संगणक प्रयोगशाळेत प्रात्यक्षिक दाखविले. महाराष्ट्र, कर्नाटकातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील १०० हून अधिक प्राध्यापक, पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते.

केआयटीचे अध्यक्ष सचिन मेनन, उपाध्यक्ष भरत पाटील, सचिव साजिद हुदली, प्रा. डॉ. मनोज पवार, प्रा. सुनील कारीदकर आदींनी यशस्वी संयोजन केले.